सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १)

# महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२

(दिनांक २६ जानेवारी, २०१५ पर्यंत सुधारित)

**(Maharashtra Act No. I of 2013)**

# Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012

**(As modified upto the 26th January, 2015)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

(किंमत २२ रुपये)

वि (जे) ६६४

(सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १)

# महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ यासाठी अर्ज करणे. | ३ |
| ४. | दाननिधीची निर्मिती. | ४ |
| ५. | स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर स्थापन केलेल्या शाळेला राज्य शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य नसणे. | ५ |
| ६. | अर्जाच्या छाननीची कार्यपद्धती. | ६ |
| ७. | परवानगी देणे. | ६ |
| ८. | शासनाचा निर्णय कळविणे. | ७ |
| ९. | विवक्षित शाळांच्या बाबतीत विशेष तरतुदी. | ७ |
| १०. | शिस्तभंगाची कारवाई. | ७ |
| ११. | शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी. | ७ |
| १२. | विद्यमान शाळांचा दर्जावाढ. | ७ |
| १३. | या अधिनियमांतर्गत येणारी कोणतीही शाळा बंद करता न येणे. | ८ |
| १४. | परवानगी काढून घेणे. | ८ |
| १५. | राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्नता मिळवू पाहणाऱ्या शाळेला अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे. | ८ |
| १६. | नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास निदेश देण्याचा अधिकार. | ९ |

**अनुक्रमणिका--**चालू


| | | |
|---|---|---|
| १७. | अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार. | ९ |
| १८. | आदेश अंतिम असणे. | ९ |
| १९. | सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. | ९ |
| २०. | अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे. | ९ |
| २१. | हा अधिनियम विद्यमान कायद्यांच्या भरीला असणे. | ९ |
| २२. | अधिकार सोपविणे. | ९ |
| २३. | नियम करण्याचा अधिकार. | १० |
| २४. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | १० |

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२

[ माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ४ जानेवारी २०१३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

(या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.)

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (१३.०४.२०१३)

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (२०.०८.२०१३)

**स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी,** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिति, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके यासंबंधात योग्य त्या तरतुदी करणे, दाननिधी निर्माण करणे, अर्जांची छाननी करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतुदी करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(क) "जिल्हा शिक्षण अधिकारी" याचा अर्थ, प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), आणि माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात, जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक), असा आहे ;

(ख) "संचालक" याचा अर्थ,—

(एक) प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), असा आहे ;

(दोन) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण) असा आहे ;

(ग) "दाननिधी" याचा अर्थ, कलम ४ अन्वये निर्माण केलेला दाननिधी, असा आहे ;

(घ) "विद्यमान शाळा" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेली व शिक्षण देत असलेली मान्यताप्राप्त शाळा, असा आहे ;

(ङ) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ,—

(एक) जिल्हा परिषदेने चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद ; १९६२ चा महा. ५.

(दोन) महानगरपालिकांनी चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये घटित केलेल्या महानगरपालिका ; १८८८ चा ३.

(तीन) नगर परिषदेने, नगर पंचायतीने किंवा यथास्थिति औद्योगिक नगरीने चालविलेल्या शैक्षणिक संस्थांच्या संबंधात, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेली नगरपरिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी ; १९४९ चा ५९.

(चार) अन्य कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरण म्हणून समजले जाणारे अन्य कोणतेही प्राधिकरण यांचा समावेश होतो. १९६५ चा महा.

असा आहे ;

[1][(च) "पूर्व प्राथमिक शाळा" याचा अर्थ, प्राथमिक शाळेला संलग्न असलेली, ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी कोणत्याही माध्यमाची बालवाडी, छोटा शिशू, मोठा शिशू किंवा कोणत्याही पूर्व-प्राथमिक पातळीपर्यंत शिक्षण देणारी शाळा, असा आहे, मात्र त्यामध्ये शिशुगृहाचा समावेश असणार नाही ;]

(छ) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज) "नोंदणीकृत संस्था" याचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० याच्या तरतुदींअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेली संस्था, असा आहे ; १८६० चा २१.

(झ) "नोंदणीकृत न्यास" याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम याच्या तरतुदींअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास, असा आहे ; १९५० चा २९.

(ञ) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे ;

(ट) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ठ) "शाळा" याचा अर्थ, [1][पूर्व-**प्राथमिक** शाळा] प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय अशी कोणतीही शासन मान्य शाळा असून, ती कोणत्याही व्यवस्थापनाकडून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर चालविण्यात येणारी व कोणत्याही भारतीय वा परदेशी अभ्यासक्रमास अथवा मंडळास संलग्न असलेली जेथे कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वत: करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २ (१) द्वारे खंड (च) वगळण्यात आला.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २ च्या (२) द्वारे मजकूर वगळला.

कोणतेही सहायक अनुदान किंवा वित्तीय साहाय्य देण्यात देण्यात येणार नाही ; आणि अशा शाळेच्या व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही, असा आहे ;

(ड) "छाननी समिती" याचा अर्थ, कलम ६ अन्वये घटित केलेली छाननी समिती, असा आहे ;

(ढ) "कलम" याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(ण) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(त) "शाळेचा दर्जावाढ" याचा अर्थ, मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेचा उच्च प्राथमिक शाळेत, उच्च प्राथमिक शाळेचा माध्यमिक शाळेत किंवा माध्यमिक शाळेचा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांना आणि—–

(एक) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यामध्ये किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांमध्ये व्याख्या केलेल्या शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात किंवा नियमात अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असतील, किंवा

२००९ चा ३५.

(दोन) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम किंवा महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ किंवा महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१ किंवा महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ किंवा महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यामध्ये ज्यांची व्याख्या केलेली आहे, त्या शब्दांचे अर्थ संदर्भानुसार आवश्यक असेल त्यानुसार या अधिनियमांमध्ये किंवा त्या अन्वये नेमून दिल्याप्रमाणेच असतील.

१९४७ चा ६१.
१९६५ चा महा. ४१.
१९७१ चा महा. ४९.
१९७६ चा महा. १३.
१९७८ चा महा. ३.

नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ यासाठी अर्ज करणे.

**३.** [1][(१)] नवीन शाळा, म्हणजे [2][**पूर्व-प्राथमिक किंवा**] प्राथमिक किंवा उच्च-प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यास, किंवा विद्यमान शाळेचा यथास्थिति, उच्च-प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्यास इच्छुक असलेला कोणताही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था, किंवा स्थानिक प्राधिकरण अनुसूची 'क' मध्ये विहित केलेल्या नमुन्यात आणि अनुसूची 'ख' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कागदपत्रांसह आणि राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शुल्कासह संबंधित शिक्षण संचालकांकडे अर्ज सादर करील ; आणि ज्या शैक्षणिक वर्षापासून परवानगी मागितली असेल त्या शैक्षणिक वर्षाच्या आधीच्या वर्षातील [3][३० जून] पूर्वी असा अर्ज करण्यात येईल :

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ३ च्या (१) द्वारे मूळ कलम ३ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ च्या (२) द्वारे मजकूर वगळला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (३) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

परंतु २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, असा अर्ज [४][१५ मार्च २०१३] पूर्वी करण्यात येईल. [५][परंतु आणखी असे की, २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता असा अर्ज ८ ऑगस्ट २०१३ पूर्वी करण्यात येईल.]

[६][ (२) शासनाला, पात्रतेबाबत घोषणा करणे, इरादा पत्र व मान्यता पत्र देण्यासह पोट-कलम (१) खाली प्राप्त झालेल्या अर्जांवर प्रक्रिया करण्याच्या कार्यपद्धतीचे तपशील विहित करता येतील.

(३) जर विकास आराखड्यामध्ये, सक्षम प्राधिकरणाने अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड शैक्षणिक प्रयोजनांसाठी राखून ठेवलेला असेल, तर अशा बाबतीत शासनास, नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट शिथिल करता येईल :

परंतु, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अशी शिथिलता भूतलक्षी प्रभावाने करता येईल.

(४) अनुसूची 'क' च्या नोंद (१२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या क्षेत्रासंबंधातील अट, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अन्वये आवश्यक असलेली मानके व प्रमाणके यांचे अनुपालन करणाऱ्या शाळांच्या दर्जावाढीच्या प्रस्तावांना लागू असणार नाही. २००९ चा ३५.

(५) कोणत्याही नोंदणीकृत न्यासाने किंवा नोंदणीकृत संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने पोट-कलम (१) अन्वये नवीन शाळा स्थापन करण्याकरिता अर्ज सादर केला असेल आणि अनुसूची 'क' च्या नोंद (११) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीकृत दस्तऐवजाव्यतिरिक्त सर्व अटींचे अनुपालन केले असेल अशा बाबतीत, जर अशा न्यासाने किंवा संस्थेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज इरादा पत्र देण्यापूर्वी सादर केले असतील, तर शासनास, अर्ज केलेली नवीन शाळा स्थापन करण्यासाठी परवानगी देता येईल :

परंतु, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता असे संबंधित यथोचित नोंदणीकृत दस्तऐवज १५ जुलै २०१३ पूर्वी सादर करण्यात येतील.]

दाननिधीची निर्मिती. **४.** (१) नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास [७][ अनुसूची 'ग' मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावी लागेल. तथापि, इरादा पत्र देण्यात येण्यापूर्वी, उक्त रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात येईल; असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याकडे तारण म्हणून ठेवण्यात येईल. असे प्रमाणपत्र किंवा अशी ठेव पुढील नवीकरणाच्या अटीच्या अधीनतेने, किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी ठेवण्यात येईल :

---

४. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तो दिनांक ३१ जानेवारी २०१३ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

५. अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (४) द्वारे नवीन परंतुक दाखल करण्यात आले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (५) द्वारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील.

७. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

परंतु, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, अशी रक्कम १५ जुलै २०१३ पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येईल, या अटीच्या अधीन, शासनास संयुक्त ठेवीची अट शिथिल करता येईल.]

(२) या दान निधीचा विनियोग, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने आणि कलम ५ च्या तरतुदीच्या अधीन राहून व्यवस्थापनाचे कायदेशीर देणे संबंधीचे दायित्व असल्यास, त्याची पूर्ती करण्यासाठी करता येईल.

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर स्थापन केलेल्या शाळेला राज्य शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य नसणे.

**५.** (१) नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या खाजगी व्यवस्थापनाकडून राज्यात कोठेही नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी करण्यात येणारा अर्ज, अशी शाळा स्थापन करणे, सुस्थितीत ठेवणे आणि चालवणे किंवा तिचा दर्जावाढ करणे या सर्व बाबी स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर करण्यात येतील या आणि केवळ याच अटीवर, अर्ज करता येईल. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या कलम १२ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वत: करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही सहायक अनुदान किंवा वित्तीय साहाय्य मागता येणार नाही ; आणि शाळेच्या अशा व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही कायदेशीर देणे संबंधीच्या दायित्वाची पूर्ती करण्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

(२) या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये शाळा चालविण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्यास दिलेली परवानगी काढून घेतल्यास किंवा अशी परवानगी न घेता एखादी शाळा स्थापन करण्यात आली असेल किंवा तिचा दर्जावाढ करण्यात आला असेल किंवा या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये परवानगी घेतल्यानंतर स्थापन करण्यात आलेली किंवा तिचा दर्जावाढ करण्यात आला असेल अशी शाळा किंवा विद्यमान शाळा कोणत्याही कारणास्तव बंद पडली असेल तर, उपरोक्तप्रमाणे एखादी शाळा स्थापन करण्यासाठी किंवा तिचा दर्जावाढ करण्यासाठी अथवा ती बंद करण्यासाठी, व्यवस्थापनाची कायदेशीर देणे संबंधीची दायित्वे सर्वप्रथम कलम ४ अन्वये निर्माण केलेल्या दान निधीमधून भागविण्यात येतील.

(३) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळा स्थापन करण्याची किंवा दर्जावाढ करण्याची परवानगी प्राप्त केलेल्या व्यवस्थापनाने पत्करलेल्या संपूर्ण कायदेशीर देणे संबंधीच्या दायित्वाची पूर्ती करण्यास दान निधी कमी पडला तर अशा दायित्वाची समप्रमाणात पूर्ती करण्यासाठी शाळेच्या व्यवस्थापनाचे त्या त्या वेळचे पदाधिकारी आणि पद धारण करणारे सदस्य हे संयुक्तपणे व पृथकपणे समप्रमाणात जबाबदार असतील :

परंतु असे दायित्व त्याच्या नकळत पत्करले गेले होते किंवा असे दायित्व पत्करण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य ती सर्व तत्परता त्याने दाखविली होती असे त्याने शाबीत केले तर, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, अशा कोणत्याही व्यक्तीस पूर्वोक्तप्रमाणे जबाबदार ठरविणार नाही.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादे कायदेशीर देणे संबंधीचे दायित्व व्यवस्थापनाने पत्करलेले असेल आणि ते दायित्व कोणताही सचिव, व्यवस्थापक किंवा कोणताही कर्मचारीवर्ग यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा दुर्लक्ष केल्यामुळे पत्करण्यात आले असेल तेव्हा, असा सचिव, व्यवस्थापक किंवा कोणताही कर्मचारीवर्ग अशा दायित्वाची पूर्ती करण्यास जबाबदार आहे, असे मानण्यात येईल.

अर्जाच्या छाननीची कार्यपद्धती. **६.** (१) छाननी समितीकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाच्या आधारे अर्जदारांना नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबत विचार करण्यास आणि त्यानुसार राज्य शासनास शिफारस करण्यासाठी राज्य शासन, अध्यक्ष व तीनपेक्षा कमी नसतील इतक्या इतर सदस्यांची राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे राज्यातील संपूर्ण क्षेत्रासाठी एक किंवा वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळ्या समित्या घटित करील. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यानुसार आवश्यक असलेली शाळेबाबतची प्रमाणके आणि मानके, तसेच वेळोवेळी विहित करण्यात येतील अशी प्रमाणके व मानके, अर्जदाराची आर्थिक सुस्थिती, शाळेच्या मतांची व्याप्ती, आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधांची उभारणी करण्यासाठीची शाळेची क्षमता, शिक्षण क्षेत्रातील तिचा अनुभव व तज्ञता या बाबी विचारात घेऊन, त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर, छाननी समितीच्या अहवालात, नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी द्यावयाची शिफारस करण्यासाठीची किंवा यथास्थिति, परवानगी अर्ज फेटाळून लावण्यासाठीची, कारणे देण्यात येतील आणि हा अहवाल कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या [1][ ३० सप्टेंबर ] रोजी किंवा त्यापूर्वी राज्य शासनास सादर करण्यात येईल : २००९ चा ३५.

परंतु २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, छाननी समिती असा अहवाल, राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, राज्य शासनाला सादर करील.

(२) राज्य शासनाला छाननी समितीचा अहवाल सादर केला जाण्यापूर्वी छाननी समिती तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करील आणि त्यासंदर्भातील हरकती व सूचना मागविणारी जाहीर नोटीस किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्या संचालकांकडे पोहोचतील अशा तऱ्हेने त्या हरकती व सूचना मागविण्यात येतील. पोट-कलम (१) अन्वये छाननी समितीने राज्य शासनाला पाठवावयाचा अहवाल हा, हरकती व सूचना कोणत्याही असल्यास, त्यासह [2][ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह ] पाठविण्यात येईल.

(३) छाननी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची अर्हता व अनुभव, अधिकार व कर्तव्ये आणि छाननी समितीचे कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केल्याप्रमाणे असेल.

परवानगी देणे. **७.** (१) छाननी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर, राज्य शासन, जिच्यासाठी अर्ज केलेला असेल अशी नवीन शाळा सुरू करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देईल किंवा नाकारील.

(२) राज्य शासनाने पोट-कलम (१) अनुसार दिलेला निर्णय अंतिम असेल.

[3][ "परंतु, शासनास, यथायोग्य पडताळणी केल्यानंतर व त्याबाबतची कारणे नोंदवून, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासह अशा कोणत्याही निर्णयाचे पुनर्विलोकन करता येईल."]

---

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ५ च्या (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ च्या (२) द्वारे "हरकती व सूचना कोणत्याही असल्यास, त्यासह" या मजकुरानंतर वरील मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे कलम ७ च्या पोट-कलम (२) ला परंतुक जादा दाखल करण्यात येईल.

शासनाचा निर्णय कळविणे. **८.** (१) कलम ३ अन्वये मागितलेली कोणतीही परवानगी देण्याबाबतचा अथवा ती नाकारण्याबाबतचा राज्य शासनाचा निर्णय, अर्जदारास, १[ कलम ३ मध्ये निर्देशिलेला वर्षाच्या ३० नोव्हेंबर ] पूर्वी कारणासह कळविण्यात येईल; आणि तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

२[ परंतु, २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, राज्य शासनाचा असा निर्णय १५ मे २०१३ पूर्वी कळविण्यात येईल. ]

(२) शाळेची स्थापना किंवा दर्जावाढ झाल्यानंतर, ज्या शैक्षणिक वर्षापासून तशी परवानगी मिळाली असेल, ते शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, व्यवस्थापन त्याबाबतची माहिती संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यास देईल.

विवक्षित शाळांच्या बाबतीत विशेष तरतुदी. **९.** राज्य शासनास, शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी वगळता कोणत्याही भाषेतून शिक्षण देणाऱ्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कमीतकमी पाच वर्षांच्या कालावधीकरिता चालविल्या गेलेल्या शाळांच्या बाबतीत, या अधिनियमान्वये अशा शाळेला परवानगी देण्याचा अधिकार असेल :

परंतु, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींचे अनुपालन केले असल्याखेरीज, अशा कोणत्याही शाळेला या कलमान्वये परवानगी दिली जाणार नाही : २००९ चा ३५.

परंतु, आणखी असे की, कलमे ३, ४ व अनुसूची 'क' चा परिच्छेद १२ यांच्या तरतुदी वगळता, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा शाळेला लागू असतील.

शिस्तभंगाची कारवाई. **१०.** कलम ३ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणे व तपासणी अहवाल सादर करणे, या अधिनियमान्वये अधिकाऱ्यांना नेमून दिलेली पदीय कर्तव्ये या कामांमध्ये चुका किंवा खोटेपणा केल्याचे आढळल्यास, किंवा अशी पदीय कर्तव्ये पार पाडण्यात जाणीवपूर्वक किंवा हेतुपूरस्सर विलंब किंवा दुर्लक्ष केले गेल्यास, सदर बाब ही शासकीय कर्तव्यपालनातील कसूर म्हणून गणली जाईल आणि असा अधिकारी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये किंवा अशा अधिकाऱ्याला लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबंद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होईल.

शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी. **११.** या अधिनियमाच्या तरतुदींन्वये शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्यास दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरिता देण्यात आली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरिता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्यांच्या आत व्यवस्थापनास शाळा सुरू करण्यात अपयश आल्यास, सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

विद्यमान शाळांचा दर्जावाढ. **१२.** (१) कोणतेही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण चालवीत असलेल्या विद्यमान शाळेस, त्यांच्या विकल्पानुसार, या अधिनियमान्वये स्वयं-अर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ मिळण्याकरिता अर्ज करील आणि, यासंदर्भात राज्य शासनाने दिलेल्या आदेशांचे किंवा निदेशांचे पालन करील.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल केला.

२. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ द्वारे, कलम ८ (पोट-कलम ७) ला परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(२) संचालकास अथवा संचालकाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही त्या शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल आणि राज्य शासनाकडे तपासणी अहवाल पाठविता येईल.

या अधिनियमांतर्गत येणारी कोणतीही शाळा बंद करता न येणे.

**१३.** (१) या अधिनियमात अन्यथा केलेली तरतूद वगळता, शाळेच्या व्यवस्थापनाचा सचिव किंवा व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व कोणत्याही पदाने संबोधली जाणारी कोणतीही व्यक्ती यांनी शाळा बंद करण्याचा अथवा तिचे काम खंडित करण्याचा व्यवस्थापनाचा उद्देश दर्शविणारी संबंधित शिक्षण संचालक आणि राज्य शासन यांना अठरा महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी पूर्वसूचना दिल्याखेरीज या अधिनियमाखाली स्थापन केलेली किंवा दर्जावाढ केलेली कोणतीही शाळा बंद करता येणार नाही किंवा तिचे काम खंडित करता येणार नाही. अशी सूचना मिळाल्यानंतर संचालक, त्याला योग्य वाटल्यास स्वविवेकानुसार सचिव, व्यवस्थापक किंवा यथास्थिति, शाळेचा कारभार पाहणारी अशी व्यक्ती यांना आपले म्हणणे समक्ष भेटून मांडण्याची संधी देईल. त्यानंतर शाळा बंद करणे किंवा तिचे काम खंडित करणे समर्थनीय असल्याचे संचालकाचे मत झाले तर, तो बाधित विद्यार्थ्यांची सोय करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे राज्य शासनाला कळवील. शासन अशा बंद होणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांची सोय नजिकच्या उपलब्ध शाळेत करण्याबाबत यथोचित कार्यवाही करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असणारी पूर्वसूचना देण्यास असा कोणताही सचिव, व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व्यक्ती कसूरदार ठरली तर, अपराध सिद्ध झाल्यावर तिला रुपये पाच लाखांपेक्षा कमी नाही पण रुपये दहा लाखांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

परवानगी काढून घेणे.

**१४.** (१) राज्य शासन, देण्यात आलेली परवानगी, अशी कोणतीही असल्यास कलम ११ च्या तरतुदींना बाध न पोचवता, आदेशाद्वारे, पुढील कारणांसाठी काढून घेऊ शकेल :—

(क) या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्ती अशा कोणत्याही असल्यास त्यांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्यास ;

(ख) विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास ; किंवा

(ग) दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास.

(२) असा न्यास किंवा संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, पोट-कलम (१) अन्वये परवानगी काढण्याबाबतचा आदेश पारित करता येणार नाही.

राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्नता मिळवू पाहणाऱ्या शाळेला अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे.

**१५.** (१) शाळा स्थापन करण्याचा किंवा चालविण्याचा ज्याचा विचार आहे, अशी शाळा राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्न करून घेणे ज्याच्या विचाराधीन आहे, असा कोणताही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण या राज्यात अशी शाळा स्थापन करण्याबाबतच्या किंवा चालविण्याच्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास, तसेच राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील अशा कोणत्याही मंडळाच्या किंवा संस्थेच्या अन्य कोणत्याही आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासही बांधिल असेल आणि अशी शाळा सुरू करण्याबाबत परवानगी मागण्यासाठीच्या सदर न्यासाच्या, संस्थेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अर्जावर या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये परवानगी घेतल्याशिवाय अशी कोणतीही शाळा स्थापन करण्यात येणार नाही आणि केवळ त्यासाठी अर्ज केलेला आहे म्हणून या राज्यात अशी शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली आहे असे समजण्यात येणार नाही.

(३) नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरण ही, या अधिनियमातील तरतुदी किंवा त्या अंतर्गत करण्यात आलेले नियम आणि विहित मानके आणि प्रमाणके यांनुसार शाळा चालवली जात असल्याची खात्री करून घेतील आणि मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असतील.

नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास निदेश देण्याचा अधिकार.

**१६.** या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा आदेशांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाला या अधिनियमातील तरतुदींशी आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांशी सुसंगत असे वाटणारे सर्वसाधारण किंवा विशिष्ट निदेश परवानगी दिलेल्या कोणत्याही नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास देता येतील आणि त्यांचे व्यवस्थापन अशा प्रत्येक निदेशाचे पालन करील.

अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

**१७.** (१) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी कोणत्याही अनुसूचीमधील कोणत्याही नोंदीमध्ये फेरबदल करून शकेल, जादा दाखल करू शकेल किंवा ती वगळू शकेल आणि त्या कारणासाठी उक्त अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये यथायोग्य सुधारणा करू शकेल आणि त्यानंतर अनुसूचीतील नोंद त्यानुसार सुधारणा झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

आदेश अंतिम असणे.

**१८.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे केलेली तरतूद वगळता, राज्य शासन किंवा संबंधित संचालक यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय, काढलेला आदेश किंवा दिलेली सूचना किंवा निदेश अंतिम असेल.

सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**१९.** या अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियम किंवा आदेशान्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

अधिकारी इत्यादी लोकसेवक असणे.

**२०.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा नियमानुसार काम करणारा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहे असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

हा अधिनियम विद्यमान कायद्यांच्या भरीला असणे.

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदी या, या अधिनियमाअंतर्गत स्थापन केलेल्या किंवा दर्जावाढ केलेल्या शाळेच्या व्यवस्थापनासंबंधातील व त्याला लागू असलेल्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या भरीला असतील व त्यांना न्यूनकारी असणार नाहीत.

अधिकार सोपविणे.

**२२.** राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कलम ६, ७ कलम १७ चे पोट-कलम (१), हे कलम आणि कलम २३ या कलमाखालील अधिकारांव्यतिरिक्त, संचालकाच्या आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याच्या अधिकारांव्यतिरिक्त, या अधिनियमाखालील त्यांचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीच्या आणि अशा नियंत्रणाच्या अधीनतेने, त्याच्या किंवा त्यांच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यांना सोपविता येतील; आणि राज्य शासन त्याच पद्धतीने, अशा प्रकारे सोपविलेले अधिकार काढून घेऊ शकेल.

नियम करण्याचा अधिकार.

**२३.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाची सर्व किंवा कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२४.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## अनुसूची 'क'

(कलम ३ पहा)

### अर्जाचा नमुना

(१) अर्जदाराचे नाव-नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण :

(२) नवीन शाळा सुरू करण्यासाठी अर्ज : १[ पूर्व प्राथमिक किंवा ] प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक स्वतंत्रपणे किंवा त्यांच्यापैकी एक किवा अनेक जोडून :

(३) शाळेचे नाव :

(४) पूर्ण पत्ता :—

(क) अर्जदाराचा :

(ख) व्यवस्थापनाच्या कार्यालयाचा :

(५) विद्यमान शाळेची श्रेणीवाढ २[ प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च माध्यमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक ] (विद्यमान शाळेचा डीआयएसई किंवा एसईएमआयएस क्रमांक द्यावा) :

(६) प्रस्तावित नवीन शाळेच्या किंवा श्रेणीवाढ करावयाच्या शाळेच्या शिक्षणाचे माध्यम :

(७) राज्य मंडळ किंवा सीबीएसई (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) किंवा आयसीएसई किंवा आयजीसीएसई किंवा आयबी किंवा सीआयई किंवा कोणतेही मंडळ किंवा संस्था ती कोणत्याही नावाने असेल यांच्याशी सध्या असणाऱ्या किंवा प्रस्तावित असणाऱ्या संलग्नतेचा तपशील :

(८) ज्या ठिकाणी शाळा आहे किंवा स्थित होणार असेल असे ठिकाण, तालुका, जिल्हा :

(९) न्यास किंवा संस्था यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत किंवा स्थानिक प्राधिकरणाचा तपशील :

---

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ८ अन्वये (१), नोंद २ मधील मजकूर वगळला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

(१०) (क) न्यास विलेख किंवा योजना यांची प्रत :

(ख) विश्वस्त, व्यवस्थापकीय समितीचे सदस्य यांचेविषयीचा तपशील आणि त्यांचे पत्ते :

(११) जमिनीचा तपशील—

[1][ (क) नोंदणीकृत न्यासाच्या किंवा नोंदणीकृत संस्थेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नावे असलेली जमीन : ]

(ख) न्यास, संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या नावाने ३० किंवा त्याहून अधिक वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा विलेख :

[2][ (ग) ]

(१२) उपलब्ध जमिनीचे क्षेत्र—

(क) मुंबई व मुंबई उपनगरात किमान अर्धा एकर :

[3][ शहरी व ग्रामीण भागात एक एकर : ]

(१३) ज्या जमिनीसाठीची कागदपत्रे सादर केलेली आहेत अशा जमिनीवरील बांधकाम (बांधकामाचा तपशील)-

(क) एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये :

(ख) बांधकामाचे क्षेत्र चौरस मीटरमध्ये :

(ग) प्रत्येक मुलामागे वर्गखोलीतील उपलब्ध क्षेत्र (प्रत्येक मुलामागे अंदाजे एक चौरस मीटर) :

एकूण बांधकामाचा तपशील :—

(एक) वर्गखोल्यांची संख्या (वर्गखोल्यांचा आकार आठ मीटर × सहा मीटर) :

(दोन) शिक्षक कक्ष :

(तीन) प्राचार्य कक्ष :

(चार) कार्यालय कक्ष :

(पाच) ग्रंथालय :

(सहा) प्रयोगशाळा :

(सात) उपक्रम कक्ष :

(आठ) संगणक कक्ष (किमान दहा संगणक) :

(नऊ) प्रसाधनगृहे (मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र शौचालये) :

---

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ८ च्या (३) (क) द्वारे नोंद ११ मधील खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ च्या (३) च्या (ख) द्वारे खंड (ग) वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ (४) द्वारे नोंद १२ मधील खंड (ख) व (ग) ऐवजी पुढील खंड दाखल केला.

(दहा) पिण्याच्या पाण्याची सुविधा :

(अकरा) आवश्यक त्या फर्निचरने सुसज्ज :

(बारा) खेळाचे मैदान :

(१४) मुलांसाठी वाहतूक सुविधा (वैकल्पिक) :

(१५) मुलांसाठी निवासाची सुविधा (वैकल्पिक) :

(१६) कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने (वैकल्पिक) :

(१७) अतिरिक्त सुविधांबाबतचा तपशील (शाळेने पुरविलेल्या) :

(१८) बँकेचा तपशील :

(क) चालू बचत खाते, नियत ठेव, रोखे :

(ख) ताळेबंद किंवा प्रमाणित लेखापरीक्षा अहवाल :

(१९) आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे तपशील, अंदाजित उत्पन्न आणि खर्चाचे तपशील :

(२०) कर्मचारीवृंद्ध प्रमाणके — प्रमाणकांनुसार पर्याप्त अर्हताप्राप्त कर्मचारीवृंद्ध.

**दिनांक :** **सही**

## अनुसूची 'ख'

(कलम ३ पहा)

### अर्जासोबतची कागदपत्रे

(१) नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत :

(२) न्यास विलेख, योजना यांची प्रत :

(३) जमिनीशी संबंधित दस्तऐवजांचा तपशील :

(४) बांधकामाशी संबंधित दस्तऐवजांचा तपशील - नकाशा, प्रारंभ प्रमाणपत्र, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र.

(५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींन्वये आवश्यक असलेली पायाभूत प्रमाणकांशी संबंधित छायाचित्रे.

(६) बँक खात्यांशी संबंधित कागदपत्रे.

(७) लेखापरीक्षणाचा अहवाल.

(८) ताळेबंद.

## अनुसूची 'ग'

[ कलम ४ (१) पहा ]

| | | |
|---|---|---|
| (क) नवीन प्राथमिक [1][ ] किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी,— | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख, |
| | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात. | रुपये किमान तीन लाख, |
| | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख, |
| | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख; |
| (ख) प्राथमिक स्तर ते उच्च-माध्यमिकपर्यंत नवीन शाळा स्थापन करण्यासाठी,— | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान पाच लाख, |
| | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात. | रुपये किमान दहा लाख, |
| | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पंधरा लाख, |
| | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान वीस लाख; |
| (ग) शाळेची उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये दर्जावाढ करण्यासाठी,— | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात. | रुपये किमान तीन लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता), |
| | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता). |

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ९ द्वारे अनुसूची 'ग' च्या नोंद (क) मधील, मजकूर वगळला.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**